# International Research Journal of Management Science & Technology

**ISSN 2250 – 1959(0nline)**
**2348 – 9367 (Print)**

*An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal*

www.IRJMST.com
www.isarasolutions.com

Published by iSaRa Solutions

# शिक्षणाचे महत्त्व असलेली आई – फेसाटी

**डॉ. सहस्रबुद्धे भारती मिलिंद**

सहयोगी प्राध्यापक

मराठी विभाग प्रमुख

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स आणि

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आर्टस् कॉलेज,

नाना पेठ, पुणे 2

फेसाटी ही नवनाथ गोरे यांची ग्रामीण कादंबरी आहे. या कादंबरीला 2018 मध्ये साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळालेला आहे. तसेच अनेक प्रादेशिक संस्थांचे पुरस्कार सुद्धा फेसाटी या कादंबरीला मिळालेले आहेत. ही कादंबरी ग्रामीण भागातील धनगर समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे व त्यांच्या जगण्याचे चित्रण करते. तसेच ही कादंबरी वाचताना महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त व अल्पभूधारक शेतकरी डोळ्यासमोर उभे राहतात. इतके शेतकऱ्यांचे जिवंत चित्रण फेसाटी या कादंबरी मधून येते.

ही कादंबरी ज्या लेखकाने लिहिली ते नवनाथ गोरे यांना घडविण्याचे व त्यांनी साहित्य क्षेत्रात जे काही केले आहे त्याचे सर्व श्रेय त्यांच्या आईला सुबक्काला किंवा काकूला जाते. कारण काकूने नवनाथ गोरे यांना शिक्षण देण्यासाठी जी धडपड केली, जे कष्ट केले त्याला तोड नाही. मला तर असे वाटते की, सुबक्का या माऊलीने किंवा काकू ने जर नवनाथ गोरे यांना शिक्षण घेण्यासाठी आग्रह केला नसता तर आज नवनाथ गोरे कोण हे कोणालाही माहित झाले नसते असे वाटते. त्यांनी जर शिक्षण घेतले नसते तर पुढे साहित्य निर्मितीही केली नसती.

जेव्हा जेव्हा नवनाथ गोरे शाळेत जायला नकार द्यायचे तेव्हा नवनाथ गोरे यांना शाळेत पाठविण्यासाठी त्यांची आई पुढाकार घेत असे.

नवीन कापड, नवीन पिशवी सगळं आणलं होतं, पण मी काकूला म्हटलं " काकू मला शाळेत जायचं नाही", यावर काकू नवनाथ गोरे यांना विचारते " कारं बाबा? तसं करुनीरं, बक्कळ शाळा शिकावं, पोलीस व्हावं. मग शाळा नाही शिकलं म्हणजी, आमच्या वाणी तुला रानात काम कराया लागतया बाबा, बगतुयाच नव्ह. त्यो दत्ता शिकला न्हाई म्हणून कामाला जातुया" म्हणजे नाथा गोरे यांच्या आईला शिक्षणाचे महत्त्व माहित आहे. आपला मुलगा शिकला पाहिजे. तो जर लहानपणी शाळेत गेला नाही तर त्याला आपल्यासारखेच आयुष्यभर शेतात शेतमजुराचे काम करावे लागेल. शाळेत गेला शिकला तर तो नोकरीला लागेल, सावलीला बसून काम करील. त्याला जीवनात काबाडकष्ट करावे लागणार नाहीत, असे तिला वाटते. इथे एका अडाणी बाईचे विचार खूपच क्रांतिकारी आहेत. नाथा गोरे यांची आई निरक्षर आहे, अडाणी आहे, परंतु तिचे शिक्षणाबद्दल असणारे विचार खूपच महत्त्वाचे आहेत. तिला शिक्षणाचे महत्त्व समजले होते. त्यामुळे जेव्हा जेव्हा नवनाथ गोरे लहानपणी शाळेत जायला नकार द्यायचे तेव्हा तेव्हा त्यांची आई त्यांना शिक्षण घेण्यासाठी, शाळेत जाण्यासाठी प्रेरित करायची असे दिसते.

नाथा गोरे यांचा पहिलीला शाळेत गेल्यावर पहिल्या दिवशी शिक्षक नाथाला नाव विचारतात. तो फक्त नाथा असे नाव सांगतो. यावर शिक्षक त्याच्यावर ओरडतात. वडिलांचे नाव सांगायला लावतात. तो वडिलांचे नाव सांगतो. परंतु आडनाव विचारल्यावर त्याला सांगता येत नाही. यावर शिक्षक त्याच्यावर ओरडतात व त्याच्या पाठीत जोरात बुक्की मारतात. नाथाच्या पोटात कळ उठते. तो

चड्डीत शु करतो. घरी गेल्यावर तो पुन्हा शाळेत जायला नकार देतो. यावर पुन्हा त्याच्या आई त्याला शाळेचे महत्त्व सांगते, "आरं बाबा, शाळा नगू म्हनूनी, शाळा शिकली म्हणजे नौकरी लागत्याई. शाळा शिकला नाय म्हणजी पुलिस कसं हुणार तू सांग?" येथे काकूला आपला मुलगा शिकला पाहिजे म्हणजे नोकरी लागून पोलीस होईल असे वाटते. परंतू त्या अगोदर त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे असा नाथा गोरे यांच्या आईचा आग्रह आहे. आपल्या कुटुंबाला सांभाळण्यासाठी त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी काकू कित्येक वेळा उपाशी राहत होती. पोटाला फडके बांधून दिवस काढत होती. सणावाराला सुद्धा नाथाच्या घरी गोडधोड जेवण नसायचे. त्याचे कारण पाचवीला पुजलेली गरिबी व अठरा विश्व दारिद्र्य हेच होते. एकदा सणाला काकूने ज्वारीच्या भाकरी केल्या होत्या. त्यावर नाथा आईला विचारतो काकू तू पोळ्या केल्या नाय व्हय, तेव्हा त्याला काकू नाही असे उत्तर देते व सांगते की, "आपल्या आयुष्याचा शिमगा चालू हाय न सन कुठला बाबा?" यावरून आपल्याला नाथा गोरे यांच्या घरच्या गरिबीची, दारिद्र्याची जाणीव होते. ही गरिबी व दारिद्र्य आपल्या पुढच्या पिढीला मिळू नये, त्यांना अतोनात कष्ट करायला लागू नये यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे. हे काकूला, नाथाच्या आईला माहित होते म्हणून ती नाथाला नेहमी शिक्षण घेण्याचा आग्रह करते.

चौथीला सातपुते गुरुजींनी पाठ सोलेपर्यंत मारलं. तेव्हाही नाथा शाळेत जाणार नव्हता. परंतु त्याच्या आईने आणि वडिलांनी शाळेत पाठवलं. जेव्हा जेव्हा नाथा शाळेत जात नाही असे म्हणत होता तेव्हा तेव्हा त्याची आई, "बाळा, तसं करुनी. शाळा शिकल्यावर नोकरीं लागत्याई" असे म्हणत असे व नाथाला शाळेत जाण्याचा आग्रह धरत असे.

दहावीच्या वर्षीही नाथा शाळेत जायला नाही म्हणत होता. तेव्हा काकू त्याला म्हणते, "येवढं दहावीच वरीस काढ. पुढ कसं हुईल तसं हुईल. शिकलास तर तुझंच कल्याण होईल. आमचं बगतुयाच नव्ह लोकांच्या रानात राबून हाड अन कातडं उगळून गेलया. कवा सुख मिळालं का? कवा घास सुखान खाल्ला का? बारा महिने बारा काळ नुसती धगधग जन्माची. आम्ही असुपातर तुझं तर चांगल करून घी. जा शाळला, तुला लागली तर मी पैस देती." काकूच्या आग्रहाने नाथा दहावीची परीक्षा पास होतो. पुढेही अकरावीला, बारावीला कॉलेजला जाणार नाही असे नाथा म्हणतो. तेव्हाही काकू त्याला शाळेचा शिक्षणाचा आग्रह धरते.

एकूणच नवनाथ गोरे किंवा नाथा गोरे आज जो कोणी आहे तो फक्त त्याच्या कष्टकरी माऊली मुळे, सुबक्कामुळे किंवा त्याच्या काकूमुळे. आपल्या मुलाने शिकावे, शाळेत जावे, त्याने नोकरीला लागावे, त्याला चांगलं जीवन मिळावे यासाठी काकूने सतत अहोरात्र कष्ट केले. अनेक वेळा ती उपाशीपोटी काम करत राहिली, कष्ट करत राहिली परंतु तिने नाथाच्या शिक्षणाचा आग्रह सोडला नाही. तिने मनोमन शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. शिक्षण काबाडकष्ट वाचू शकते. शिक्षणामुळेच आपल्या मुलाबाळांच्या आयुष्यात प्रकाश पडू शकतो. हे तिने ओळखले होते. यामुळेच मला अडाणी व निरक्षर असूनही ' फेसाटी' या कादंबरीतील नाथाची आई सुबक्का किंवा काकू जास्तच भावते.

संदर्भ :-


1) गोरे नवनाथ, फेसाटी, अक्षर वाड्•मय प्रकाशन, पुणे, सातवी आ. 2022, पृ. क्र. 23
2) तत्रोव पृ. क्र. 28
3) तत्रोव पृ. क्र. 35
4) तत्रोव पृ. क्र. 46 ते 47
5) तत्रोव पृ. क्र. 49
6) तत्रोव पृ. क्र. 113 ते 114

# ISARA INSTITUTE OF MANAGEMENT & PROFESSIONAL STUDIES




RSEARCH GATEWAY







AROGYAM ONLINE

# PARIVARTAN PSYCHOLOGY CENTER






**भारतीय भाषा, शिक्षा, साहित्य एवं शोध**

**ISSN 2321 – 9726**

**WWW.BHARTIYASHODH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SCIENCE & TECHNOLOGY**

**ISSN – 2250 – 1959 (0) 2348 – 9367 (P)**

**WWW.IRJMST.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF COMMERCE, ARTS AND SCIENCE**

**ISSN 2319 – 9202**

**WWW.CASIRJ.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES**

**ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)**

**WWW.IRJMSH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF SCIENCE ENGINEERING AND TECHNOLOGY**

**ISSN 2454-3195 (online)**

**WWW.RJSET.COM**

**INTEGRATED RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT, SCIENCE AND INNOVATION**

**ISSN 2582-5445**

**WWW.IRJMSI.COM**

**JOURNAL OF LEGAL STUDIES,POLITICS AND ECONOMICS RESEARCH**

**WWW.JLPER.COM**